तरुण भारत

# निसर्गाचा ऱ्हास थांबवणे गरजेचे

## नंदूशेठ पटवर्धन यांचे प्रतिपादन; मित्रमेळातर्फे बालमित्रांसाठी 'चला साकारू गणराय' उपक्रम

वार्ताहर
राजापूर

गणेशोत्सवामध्ये प्लॅस्टर ऑफ पॅरीसची गणेशमूर्ती, थर्माकॉल सारख्या वस्तू वापरून आरास केली जात असल्याने दिवसेंदिवस निसर्गाचा ऱ्हास होत असून निसर्गाचा होणारा ऱ्हास थांबवण्यासाठी मनुष्याने निसर्ग नियमाला धरूनच चालले पाहिजे. मुलांनी शाडूच्या मातीचा गणपती करूनच त्यांचे गणेशोत्सवामध्ये पुजन करावे, असे आवाहन आसमंत बेनोव्हलन्स फाऊंडेशन रत्नागिरीचे नंदकुमार पटवर्धन यांनी राजापूर येथे केले.

मागील काही वर्षे 'थोडे रंजन थोडे अंजन' हे उद्दीष्ट समोर ठेवीत कार्यरत असलेल्या 'मित्रमेळा' राजापूर यांच्या मार्फत यंदाच्या गणेशात्सवाच्या निमित्ताने राजापूर शहर व परिसरातील बालमित्रांसाठी 'चला साकारू गणराय' अर्थात बालकलाकारांनी त्यांच्या कल्पनेतून साकारलेली गणेशमूर्ती हा उपक्रम आयोजित केला होता. यावेळी ते

**पटवर्धन म्हणाले...!**

- मनुष्याने निसर्ग नियमांना धरूनच चालले पाहिजे
- मुलांनी बनवलेल्या गणेशमुर्तीमध्ये दैवत असते

बोलत होते. त्यांनी पुढे बोलताना मुलांकडून गणपतीची मुर्ती तयार करून तीचे घरी पुजन करावे कारण, मुलांनी बनवलेल्या गणेशमूर्तीमध्ये दैवत आलेले असते, त्यांनी असे सांगितले. यावेळी आसमंत बेनोव्हलन्स फाऊंडेशन, रत्नागिरीच्यावतीने उपस्थित मुलांना गणेश अथर्वशिर्षची पुस्तके वाटण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन कलाकार काशिनाथ गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. काशिनाथ गुरव यांनी मुलांना मार्गदर्शन करताना मुर्ती कशी तयार करावी, या संदर्भात मार्गदर्शन केले.

मित्रमेळा राजापूर आणि आसमंत बेनोव्हलन्स फाऊंडेशन रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. छोट्या दोस्तांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीकोनातून मित्रमेळा राजापूरतर्फे यापूर्वी सुट्टीतील संस्कार वर्गाचा उपक्रम सुरू केला असून त्याचाच एक पुढील टप्पा म्हणून हा उपक्रम हाती घेतला होता. मारूती मंदिर धर्मशाळा, राजापूर येथे बालमूर्तीकारांचा मेळावा आयोजित करून व उपस्थित बालमूर्तीकारांना शाडूची माती उपलब्ध करून देऊन त्याद्वारे छोट्या मित्रांनी त्यांच्या स्वकल्पनेतून गणरायाची मूर्ती साकारली. यावेळी राजापूर शहरातील शाळांबरोबर तालुक्यातील शाळांमधील सुमारे ७५ मुलांनी सहभाग घेतला होता.

छोट्या मित्रांच्या कल्पनाशक्तीला तसेच त्यांच्यातील हस्तकलेला वाव मिळावा याच्या बरोबरीनेच पर्यावरणपूरक पारंपारिक गणेशोत्सवाची जाणीव नव्या पिढीत जोपासली जावी हे उद्दीष्ट समोर ठेऊन हा कार्यक्रम यावेळी आयोजित केला होता तर पुढील वर्षी पासून हाच कार्यक्रम स्पर्धात्मक घेतला जाणार असल्याचे यावेळी घोषित करण्यात आले.

### संस्थेच्या प्रयत्नांना यश

आसमंत बेनोव्हलन्स फाऊंडेशन रत्नागिरीचे नंदूशेठ पटवर्धन यांच्या प्रेरणेतून बालमित्रांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने मित्रमेळा राजापूर यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या या उपक्रमात सहभागी होत संस्थेच्या प्रयत्नांना भरघोस प्रतिसाद मिळाला. आणि यावर्षीच्या गणेशोत्सवाची सुरूवात अशा अनोख्या उत्साहात करावी असे आवाहन मित्रमेळा राजापूर यांच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नंदूशेठ पटवर्धन, मित्रमेळाचे अध्यक्ष विवेक गुणे, ॲड.पराग मोदी, अनंत रानडे, शेखर अभ्यंकर, अभिजीत नार्वेकर, मंदार शेट्ये, ॲड. सुशांत पवार, शैलेश आंबेकर, राजू सरखोत, रमेश गुणे यांच्यासहीत मित्रमेळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.